गाजू लागताच केळकरांनी एच.एम.व्ही.ला नोटीस पाठविली. मी ही हकीकत अण्णांना सांगितली. अण्णा म्हणाले, 'काळजी करू नकोस. मी त्या केळकरांना समजावेन.' मग अण्णांनीच ते प्रकरण मिटविले. अण्णा मात्र माझ्यावर खूश होते. कारण ती गाणी सर्वत्र गाजत होती. ते मला म्हणाले, 'खळे, तू गोरी गोरीपान या गाण्याने मला अगदी घराघरांत पोहचविलेस. लहान मुलांची गाणी करावीत तर तूच.'

आज या घटनाक्रमांचा जेव्हा विचार करतो तेव्हा जे होते ते भल्यासाठी असे वाटते. माझी ती गाणी जर चित्रपटात वापरली गेली असती तर कदाचित त्यांच्या वाट्याला इतकी लोकप्रियता आली असती का, याची शंका वाटते. पण भावगीतांच्या स्वरूपात ती लोकांसमोर आल्यामुळे त्यांच्या भावविश्वाचा ती अविभाज्य भाग होऊन राहिली, हेच खरे. १९५२ साली रेकॉर्ड झालेल्या या गाण्यांना या वर्षी पन्नास वर्षे पूर्ण झाली. पण अजूनही त्यांची लोकप्रियता कायम आहे. आजही मी सादर करीत असलेल्या 'श्रीनिवास खळे संगीत रजनी'मध्ये संगीतरसिक आवर्जून या गाण्यांची फर्माईश करतात.

**शब्दांकन- विश्वास नेरुरकर**

**nerukar@bol.net.in**